http://www.epitomejournals.com, Vol. 2, Issue 10, October 2016, ISSN: 2395-6968

Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968 | Impact Factor = 3.656

# औरंगाबाद जिल्ह्यातील मानवी साधन संपत्तीचा भौगोलीक अभ्यास



**Dr. CU Bhore**

Assistant Professor & Head,

Dept. of Geography

Sant Dnyaneshwar Mahavidyalaya, Soegaon;

Dist. Aurangabad, MS, India

Email : bhorechatragun@gmail.com

## Abstract

राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने साधनसंपत्ती ही महत्त्वाची असते. साधन संपत्तीचे प्रामुख्याने नैसर्गीक साधनसंपत्ती व मानवी साधनसंपत्ती असे दोन प्रमुख प्रकार पडतात. प्रदेशामध्ये उपलब्ध असलेल्या नैसर्गीक साधनसंपत्तीपेक्षा मानवी साधन संपत्तीला विशेष महत्व असते. मानवी संसाधनाच्या विकासावरच त्या प्रदेशातील नैसर्गीक संसाधनाचा विनियोग व विकास अवलंबुन असतो. मानवी संसाधनाच्या विकासावर त्या प्रदेशातील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतीक घटकाचा प्रभाव पडत असतो. लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचा उदा.लोकसंख्येचे वितरण व घनता, लोकसंख्येची वाढ, साक्षरता,स्त्रीपुरूष प्रमाण, ग्रामिण व नागरी लोकसंख्या, आयुर्मात इत्यादी घटकांचा अभ्यास अनेक दृष्टीने महत्वाचा असुन यावर त्या प्रदेशातील भौगोलीक स्थितीचा प्रभाव पडत असतो. प्रदेशाच्या विकासात संख्यात्मक लोकसंख्या वाढीपेक्षा लोकसंख्येतील गुणात्मकवाढ ही महत्वाची असते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात औरंगाबाद जिल्ह्यातील मानवी साधनसंपत्तीची विविध वैशिष्टे जसे वितरण, वाढ, घनता, ग्रामीण व नागरी लोकसंख्या, साक्षरता, स्त्री-पुरूष इत्यादींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## Keywords


मानव संसाधन, गणिती घनता, वृध्दी, नागरी लोकसंख्या, साक्षरता

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.


**अभ्यास क्षेत्र :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी औरंगाबाद जिल्हा निवडला आहे. औरंगाबाद जिल्ह्याचे स्थान महाराष्ट्राच्या मध्यवर्ती ठिकानी येत असुन जिल्ह्यामध्ये सोयगांव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, औरंगाबाद, गंगापुर, वैजापुर, पैठण या नऊ तालुक्याचा समावेश होतो. औरंगाबाद जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १९°१८′ उत्तर ते २०°४०′ उत्तर अक्षांश आणि रेखावृत्तीय विस्तार ७४°४०′ पूर्व ते ७६°४०′ पूर्व रेखांश आहे. जिल्ह्याची पूर्व पश्चिम लांबी २०१ कि.मी.तर उत्तर दक्षिण लांबी १६१ कि.मी.आहे. औरंगाबाद जिल्ह्याच्या उत्तरेस जळगांव जिल्हा, पुर्वेस जालना जिल्हा, पश्मिेस नाशिक जिल्हा, नैऋत्येस अहमदनगर जिल्हा तर अग्नेय व दक्षिणेस बीड जिल्ह्याच्या सरहद्दी आहेत.


औरंगाबाद जिल्हा दर्शवणारा महाराष्ट्राचा नकाशा




औरंगाबाद जिल्हा




औरंगाबाद जिल्ह्याचा बहुतांश भाग हा गोदावरी खो-यात येत असुन उत्तरेकडील संपूर्ण सोयगांव व सिल्लोड तालुका कन्नड व वैजापुर तालुक्यातील उत्तरेकडील काहीभाग तापी नदी खो-यात येतो जिल्ह्यातील भूप्रदेशाचा उत्तर साधारण पणे दक्षिण व पुर्वेकडे असुन उत्तरेस पूर्व पश्चिम दिशेत अजिंठा-सातमाळा डोंगररांग आहे.




औरंगाबाद जिल्ह्याचे एकुण भौगोलक क्षेत्रफळ १०१३७.६१ चौ.कि.मी. असुन त्यापैकी ३०९.३५ चौ.कि.मी. क्षेत्रफळ नागरी भागात तर ९८२८.२६ चौ.कि.मी. क्षेत्र ग्रामिण भागात आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकुण १३५६ गावे आहेत त्यापैकी १३५६ गावे वस्ती असलेली तर ४२ गावे ओसाड आहेत. जिल्ह्यात ११ नागरी क्षेत्रापैकी औरंगाबाद येथे महानगरपालिका, छावनीसाठी एक छावनी परीषद,

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.

सिल्लोड येथे ब वर्ग नगर पालिका, वैजापूर, गंगापूर, पैठण, कन्नड व खुलताबाद येथे पाच क वर्ग नगर पालीका आहेत. सोयगांव व फुलंब्री येथे नविन दोन नगर पंचायत अस्तित्वात आल्या आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्याची एकुण लोकसंख्या ३७,०१,२८२ इतकी असुन त्यापैकी ग्रामीण लोकसंख्या २०,८१,११२ तर १६,२०,१७० इतकी नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यामध्ये दर १००० पुरूषामागे ९२३ स्त्रीया असे प्रमाण आहे.

औरंगाबाद जिल्ह्याची ओळख एक पर्यटन जिल्हा आहे. महाराष्ट्राची पर्यटन राजधानी म्हणून औरंगाबादला संबोधले जाते. जिल्ह्यामध्ये बारा ज्योतीर्लींगापैकी एक वेरूळ येथे घृश्नेश्श्वराचे मंदीर आहे तर जागतीक संघटनेने (UNESCO) जागतीक वारसा स्थळे म्हणुन घोषीत केलेले वेरूळ व अजिंठा येथे लेण्या आहेत. पैठण येथे गोदावरी नदीवर जायकवाडी धरण असुन त्याच्या पायथ्याला संत ज्ञोनश्वरांच्या नावे पर्यटकांसाठी उद्यानाची उभारणी केलेली आहे. औरंगाबाद शहेर हे ५२ दरवाज्याचे शहर म्हणून ओळखले जात असून त्याचा स्मार्ट सिटीच्या विकसीत होणा-या शहरामध्ये समावेश करण्यात आला आहे. औरंगाबाद शहराचा औद्योगीक विकास झपाट्याने होत असुन येथे चिकलठाणा, वाळुज व रेल्वेस्टेशन येथे औद्योगीक वसाहती विकसीत झाल्या आहेत. सध्या शेंद्रा येथे नव्याने पंचतारांकीत औद्योगीक क्षेत्र विकसीत केले असून दिल्ली-मुंबई या (DMIC) औद्योगीक पट्ट्यात औरंगाबाद शहराचा समावेश करण्यात आलेला आहे.

### संशोधनाची उद्दीष्टे :

औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचा भौगोलीक अभ्यास करणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

१) औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता, वृध्दी व वितरण अभ्यासने.

२) जिल्ह्यातील साक्षरता व स्त्री पुरूष प्रमाणतेचा अभ्यास करणे

३) जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी लोकसंख्येचे वितरण अभ्यासने

### सांख्यीकी माहितीचे संकलन आणि संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी आवश्यक माहितीचे संकलन द्वितीय स्वरूपाच्या माहितीच्या आधारे केलेले आहे. ही माहीती औरंगाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, औरंगाबाद जिल्हा जनगणना, औरंगाबाद जिल्हा गॅझेटीअर, विविध प्रकाशने व संदर्भग्रंथ यांच्याद्वारे मिळवली आहे. २००१ व २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील गणितीय घनता, नागरी व ग्रामीण लोकसंख्येची घनता काढली आहे. या शोधनिबंधामध्ये छायांकीत पद्धतीचे नकाशे, आलेख, विभाजीत वर्तुळ या नकाशातंत्राचा उपयोग करून लोकसंख्येची विविध वैशिष्टे दाखविली आहेत.

### विषय विवेचन :

लोकसंख्येचे वितरण हे भौगोलीक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतीक घटकावर अवलंबुन असते. लोकसंख्या शास्त्रीय घटक हे आर्थिक व सामाजिक विकासाचे उत्तम दर्शक असते. लोकसंख्येचे वितरण, वाढ , घनता, ग्रामीण व नागरी लोकसंख्या, साक्षरता, स्त्री पुरूषप्रमाण, आयुर्मान इ. घटक मानवी साधन संपत्तीचे मुल्यमापन करयासाठी महत्वाचे


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.

असतात. म्हणून औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्याचा अभ्यास करण्यासाठी २००१ व २०११ ची जनगणना अहवालाचा आधार घेण्यात आला आहे.

**लोकसंख्येची घनता :**

लोकसंख्येची घनता आणि वितरण या दोन्ही संकल्पना एकमेकांशी परस्पर संबंधीत आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्येची विभागणी अचूक समजून घेण्यासाठी जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता व तीचे विरणाचा अभ्यास केला आहे. जिल्ह्याची लोकसंख्या व एकुण क्षेत्रफळाच्या गुणोत्तरास लोकसंख्येची घनता असे म्हणतात. २०११ च्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्येची घनता प्रति चौ.कि.मी. ला ३६५ आहे तर औरंगाबाद जिल्ह्याची लोकसंख्या घनता प्रति चौ.कि.मी. ला ३६६ आहे. जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्या घनता पहात असताना सर्वाधिक लोकसंख्या घनता औरंगाबाद तालुक्यात प्रति चौ.कि.मी. ला ११९३ आहे. सिल्लोड तालुक्यामध्ये प्रति चौ.कि.मी. ला २९१ तर वैजापूर तालुक्यात २७४ लोकसंख्येची घनता आहे. जिल्ह्यामध्ये सर्वात कमी लोकसंख्येची घनता सोयगांव तालुक्यात प्रति चौ.कि.मी. ला १७१ आहे. (पहा सारणी क्र.१)

**सारणी क्रमांक १ औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्या घनता (प्रति चौ.कि.मी.)**

| तहसील | क्षेत्रफळ चौ.कि.मी. | लोकसंख्या २०११ | लोकसंख्या घनता |
|---|---|---|---|
| कन्नड | १५०७.८० | ३४१०१९ | २२६ |
| सोयगांव | ६५९.९० | ११३०८७ | १७१ |
| सिल्लोड | १२३५.९० | ३५९९६३ | १९१ |
| फुलंब्री | ६६८.९० | १६१०१२ | २४१ |
| औरंगाबाद | १३३३.०० | १५९०३७४ | ११९३ |
| खुलताबाद | ४८४.९० | ११८३२८ | २४४ |
| वैजापूर | १३०८.५० | ३११३७१ | २०६ |
| गंगापुर | १५१०.५० | ३५८१५५ | २७४ |
| पैठण | १४२८.२१ | ३४७९७३ | २४४ |
| एकुण | १०१३७.६१ | ३७०१२८२ | ३६६ |

स्त्रोत- जिल्हा जनगणना अहवाल-२०११

**लोकसंख्येचे वितरण व वाढ :**

औरंगाबाद जिल्ह्यतील लोकसंख्येच्या वितरणाचा अभ्यास करत असताना २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकुण लोकसंख्या ३७०१२८२ आहे. एकुण लोकसंख्येपैकी औरंगाबाद तालुक्यात सर्वाधीक १५९०३७४ वितरीत झाली असुन सिल्लोड-३५९९६३, गंगापुर-३५८१५५, पैठण-३४७९७३, कन्नड-३४१०१९, वैजापुर-३११३७१, फुलंब्री-१६१०१२, खुलताबाद-११८३२८ लोकसंख्या वितरीत झाली आहे. तर सर्वात कमी लोकसंख्या सोयगांव तालुक्यात ११३०८७ वितरीत झाली आहे. (पहा सारणी क्रमांक २)


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.

**सारणी क्रमांक २ - औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्येचे वितरण व वृध्दी**

| तहसील | लोकसंख्या | | वृध्दी |
|---|---|---|---|
| | २००१ | २०११ | |
| कन्नड | २९२६७ | ३४१०१९ | १७.०८ |
| सोयगांव | ९०१४२ | ११३०८७ | २५.४५ |
| सिल्लोड | २९१०५६ | ३५९९६३ | २३.६७ |
| फुलंब्री | १३१३२७ | १६१०१२ | २२.६० |
| औरंगाबाद | ११६५५६७ | १५९०३७४ | ३६.४४ |
| खुलताबाद | १०१५०० | ११८३२८ | १६.५७ |
| वैजापूर | २५९६०१ | ३११३७१ | १९.९६ |
| गंगापुर | २७९११७ | ३५८१५५ | २८.२८ |
| पैठण | २८७३५६ | ३४७५७३ | २१.०९ |
| एकुण | २८९७०११३ | ३७०१२८२ | २७.७६ |

स्त्रोत-औरंगाबाद जिल्हा जनगणना अहवाल २००१ व २०११

**लोकसंख्या वृध्दी :**

लोकसंख्या वृध्दी म्हणजेच लोकसंख्या वाढ होय. लोकसंख्येतील वाढ ही नेहमी धन असतेच असे नाही तर ती काही वेळा ऋण ही असु शकते. प्रदेशातील एका विशिष्ट कालावधीसाठी तेथे निवास करणा-या लोकसंख्येत झालेला बदल म्हणजे लोकसंख्या वाढ होय. औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्या वृध्दीचा अभ्यास करण्यासाठी १९७१ ते २०११ च्या जनगणना अहवालाचा आधार घेतला आहे. जिल्ह्यामध्ये १९७१ ते १९८१ या दशकात १२.८६ प्रतिशत वृध्दी झाली आहे. १९८१ ते १९९१ या दशकात ३९.९६ प्रतिशत, १९९१ ते २००१ या दशकात ३०.८६ प्रतिशत, २००१ ते २०११ या दशकात २७.७६ प्रतिशत लोकसंख्येत वृध्दी झाली आहे. जिल्ह्यात प्रामुख्याने १९८१ ते १९९१ या दशकात औरंगाबाद येथे औद्यागीकरण मोठ्या प्रमाणात झाल्याने लाकसंख्येत याच दशकात सर्वाधीक वृध्दी झाली आहे. १९८१ ते १९९१ या दशकात नागरी लोकसंख्येत सर्वाधीक वृध्दी ८३.८७ प्रतिशत झाली आहे. (पहा सारणी क्रमांक-३) २००१ ते २०११ या दशकातील औरंगाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्या वृध्दीचा अभ्यास करत असताना औरंगाबाद तालुक्यामध्ये सर्वाधीक ३६.४४ प्रतिशत वृध्दी झाली आहे. २००१ ते २०११ या दशकात गंगापुर २८.२८ प्रतिशत सोयगांव २५.४५ प्रतिशत, वैजापुर-१९.९६ प्रतिशत, कन्नड-१७.०० प्रतिशत तर सर्वात कमी खुलताबाद तालुक्यात लोकसंख्येमध्ये वृध्दी १६.५१ प्रतिशत वृध्दी झाली आहे. (पहा सारणी क्रमांक ०२)


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.

**सारणी क्रमांक ३- जिल्ह्यातील लोकसंख्येतील दशवार्षिक वृध्दी**

| वर्षे | प्रकार | एकुण लोकसंख्या | वृध्दी प्रतिशत |
|---|---|---|---|
| १९७१ | एकुण | १४०१५७४ | -- |
| | ग्रामीण | १०२४८६२ | -- |
| | नागरी | ३७६७१२ | -- |
| १९८१ | एकुण | १५८१७६६ | १२.८६ |
| | ग्रामीण | ११८७३८८ | १५.८६ |
| | नागरी | ३९४३७८ | ०४.६९ |
| १९९१ | एकुण | २२१३७७९ | ३९.९६ |
| | ग्रामीण | १४८८६३६ | २५.२७ |
| | नागरी | ७२५१४३ | ८३.८७ |
| २००१ | एकुण | २८९७०१३ | ३०.८६ |
| | ग्रामीण | १८०९८६३ | २१.५८ |
| | नागरी | १०८७१५० | ४९.९२ |
| २०११ | एकुण | ३७०१२८२ | २७.७६ |
| | ग्रामीण | २०८१११२ | १४.९९ |
| | नागरी | १६२०१७० | ४९.०३ |

स्त्रोत- जनगणना अहवाल १९७१ ते २०११

**ग्रामीण व नागरी लोकसंख्या :**

नागरी भागात रोजगाराच्या संधी, शैक्षणिक सुविधा, वैद्यकीय सुविधा, मनोरंजन, व्यापाराच्या संधी, वहातुक व दळनवळन इत्यादी मुबलक सुविधा उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातुन नागरी भागात मोठ्या प्रमाणात लोकसंख्येचे स्थलांतर होते. त्यामुळे नागरी भागातील लोकसंख्येमध्ये जलद गतीने वृध्दी होते. २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यातील एकुण लोकसंख्ये ४३.७७ प्रतिशत लोकसंख्या नागरी भागात रहाते. जिल्ह्यामध्ये औरंगाबाद तालुक्यात नागरी लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधीक असुन ते ८२.३१ प्रतिशत आहे. गंगापुर तालुक्यात २८.४७ प्रतिशत पैठण १५.२४ प्रतिशत, सिल्लोड १६.१७ प्रतिशत, खुलताबाद १३.३० प्रतिशत, वैजापुर १३.२६ प्रतिशत तर कन्नड तालुक्यात ११.९५ प्रतिशत नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार सोयगांव व फुलंब्री तालुक्यात नागरी लोकसंख्या शुन्य आहे.


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.

**सारणी नं. ४ औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या**

| तहसील | लोकसंख्या-२०११ | | | वृध्दीदर प्रतिशत |
|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकुण | |
| कन्नड | ३००२६० | ४०७५९ | ३४१०१९ | ११.९५ |
| सोयगांव | ११३०८७ | ०० | ११३०८७ | ०० |
| सिल्लोड | ३०१७३३ | ५८२३० | ३५९९६३ | १६.१७ |
| फुलंब्री | १६१०१२ | ०० | १६१०१२ | ०० |
| औरंगाबाद | २८१२६८ | १३०९१०६ | १५०३७४ | ८२.३१ |
| खुलताबाद | १०२५७९ | १५७४९ | ११८३२८ | १३.३० |
| वैजापूर | २७००७५ | ४१२९६ | ३११३७१ | १३.२६ |
| गंगापुर | २५६१६८ | १०१९८७ | ३५८१५५ | २८.४७ |
| पैठण | २९४९३० | ५३०४३ | ३४७९७३ | १५.२४ |
| एकुण | २०८१११२ | १६२०१७० | ३७०१२८२ | ४३.७७ |

स्त्रोत-जनगणना अहवाल-२०११

**साक्षरता :**

ज्या व्यक्तीला आपल्या मातृभाषेत लिहीता व वाचता येते त्या व्यक्तीला साक्षर संबोधले जाते. प्रदेशातील साक्षर तेवरच त्या प्रदेशाचा आर्थिक, सामाजीक व सांस्कृतीक विकास अवलंबुन असतो. तर समाजाच्या आर्थिक विकासाच्या पातळीवर साक्षरता अवलंबुन असते. साक्षरता ही मानवाच्या प्रगतीचे एक महत्वपुर्ण अंग आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण ७२.९० टक्के होते तर २०११ च्या जनगणनेनुसार ७९.०२ टक्के साक्षरता आहे. साक्षरता दरामध्ये या दहावर्षात ६.१२ ने वाढ झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यात सर्वाधीक साक्षरता औरंगाबाद तालुक्यात ८५.०३, टक्के आहे तर गंगापुर तालुक्यात ७६.६१, कन्नड-७६.६०, वैजापुर-७६.३६, खुलताबाद-७५.८२, पैठण-७३.४८, फुलंब्री-७३.०२, सिल्लोड-७२.८९, टक्के साक्षरता आहे सर्वातकमी साक्षरता सोयगांव तालुक्यात ७०.५७ टक्के आहे. (पहा सारणी क्रमांक ०५)

**सारणी क्र. ०५ औरंगाबाद जिल्ह्यातील साक्षरता**

| तहसील | साक्षरता | |
|---|---|---|
| | २००१ | २०११ |
| कन्नड | ६८.८० | ७६.६० |
| सोयगांव | ६५.१० | ७०.५७ |
| सिल्लोड | ६६.१० | ७२.८९ |
| फुलंब्री | ६६.२० | ७३.०२ |
| औरंगाबाद | ८०.३० | ८५.०३ |
| खुलताबाद | ६८.८० | ७५.८२ |
| वैजापूर | ६९.१० | ७६.६१ |
| गंगापुर | ७०.८० | ७६.३० |
| पैठण | ६६.५० | ७३.४८ |
| एकुण | ७२.९० | ७९.०२ |

स्त्रोत-जिल्हा जनगणना २००१ व २०११

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.

**स्त्री-पुरूष प्रमाण :**

समाज रचनेची निर्मिती स्त्री आणि पुरूषातुन होत असते. म्हणुन स्त्री पुरूष प्रमाणामध्ये संतुलन असणे आवश्यक असते. स्त्री-पुरूष प्रमाणाला लिंगरचना असे ही म्हणतात. लिंगरचना ही त्या प्रदेशातील एकुण लोकसंख्येतील दर १००० पुरूषामागे स्त्रीयांचे किती प्रमाण आहे त्यावरून ठरत असते.

औरंगाबाद जिल्ह्यामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार नागरी भागात दर १००० पुरूषामागे ९२३ स्त्रीया असे प्रमाण आहे तर ग्रामीण भागात ९२४ प्रमाण आहे. २००१ च्या तुलनेत २०११ च्या जनगणनेमध्ये स्त्री पुरुष प्रमाणतेमध्ये दर १००० पुरूषाप्रमाणे ग्रामीण भागात १२ ने घटझाली असुन नागरी भागात १८ ने वाढ झाली आहे. (पहा सरणी क्रमांक ०६)

**सारणी क्रमांक ०६- जिल्ह्यातील लिंगरचना**

| विभाग | लिंगरचना | | फरक |
|---|---|---|---|
| | २००१ | २०११ | |
| ग्रामीण | ९३६ | ९२४ | -१२ |
| नागरी | ९०५ | ९२३ | +१८ |
| एकुण | ९२२ | ९२३ | +१ |

स्त्रोत-जिल्हा जनगणना २००१ व २०११

२०११ च्या जनगणनेनुसार पैठण तालुक्यात ग्रामीण भागात सर्वाधीक प्रति १००० पुरूषामागे ९३६ स्त्रीयांचे प्रमाण असुन सर्वात कमी औरंगाबाद तालुक्यातील ग्रामीण भागात प्रति १००० पूरूषामागे ९०२ स्त्रीयांचे प्रमाण आहे. तर २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील वैजापुर तालुक्यातील नागरी भागात सर्वाधीक प्रति १००० पुरूषामध्ये ९४४ स्त्रीयांचे प्रमाण असुन सर्वात कमी गंगापुर तालुक्यातील नागरी भागात प्रति १००० पुरूषामागे ९०१ स्त्रीया असे प्रमाण आहे. (पहा सारणी क्र.०७)

**सारणी क्र.०७ - औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय लिंगरचना**

| तहसील | स्त्री-पुरूष प्रमाण | | | |
|---|---|---|---|---|
| | २००१ | | २०११ | |
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी |
| कन्नड | ९२८ | ९२५ | ९१९ | ९२८ |
| सोयगांव | ९४४ | - | ९२० | - |
| सिल्लोड | ९५१ | ९१८ | ९२२ | ९३६ |
| फुलंब्री | ९५१ | - | ९२६ | - |
| औरंगाबाद | ९११ | ९०१ | ९०२ | ९२२ |
| खुलताबाद | ९२८ | ९२५ | ९३१ | ९४१ |
| वैजापूर | ९२५ | ९१६ | ९२७ | ९०१ |
| गंगापुर` | ९५० | ९३५ | ९३५ | ९४४ |
| पैठण | ९४८ | ९५२ | ९३६ | ९३८ |
| एकुण | ९३६ | ९०५ | ९२४ | ९२३ |

स्त्रोत-जिल्हा जनगणना अहवाल २००१ व २०११

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.

**धर्मानुसार लोकसंख्या :**

२०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यातील एकुण लोकसंख्येच्या तुलनेत हिंदु ६८.७७ टक्के, मुस्लीम-२१.२५ टक्के, बौध्द-८.३५ टक्के, जैन-०.८३ टक्के, ख्रिश्चन-०.४३ टक्के, शिख-०.१३ टक्के लोकसंख्या आहे.

२००१ ते २०११ या दशकातील धर्मानुसार लोकसंख्या वाढीमध्ये सर्वाधीक मुस्लीम लोकसंख्येमध्ये - ३८.१३ टक्के वाढ झाली आहे. तर हिंदु-२५.३७ टक्के, बौध्द-२५.०२ टक्के, जैन-१५.६७ टक्के, शिख-१५.४९ टक्के तर सर्वात कमी ख्रिश्चन धर्मीय लोकसंख्येत २.७८ टक्केच वाढ झाली आहे. (पहा सारणी क्र.०८)

२०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागात हिंदु धर्मीय लोकसंख्या सर्वाधीक वास्तव्य करत असून ती एकुण हिंदु लोकसंख्येच्या ६५.२२ टक्के आहे तर ईतर सर्व धर्मांची लोकसंख्या ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात अधिक वास्तव्य करते. (पहा सारणी क्र.०८)

| धर्म | लोकसंख्या २००१ | लोकसंख्या २०११ | | | | दशवार्षिक वृध्दी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण | एकुण लोकसंख्येचे प्रमाण | ग्रामीण | नागरी | |
| हिंदु | २०३०१८१ | २५४५४३८ | ६८.७७ | १६६०१५८ | ८८५२८० | २५.३७ |
| मुस्लीम | ५९९५१६ | ७८६६७७ | २१.२५ | ३१००२७ | ४७६६५० | ३८.१३ |
| बौध्द | २४७२२२ | ३०९०९३ | ८.३५ | ९६५३६ | २१२२५७ | २५.०२ |
| जैन | २६७८२ | ३०९८१ | ०.८३ | ६४९६ | २४४८५ | १५.६७ |
| ख्रिश्चन | १५५५८ | १५९९१ | ०.४३ | २५०१ | १३४९० | २.७८ |
| शिख | ४४५२ | ५१४२ | ०.१३ | ७९० | ४३५२ | १५.४९ |
| इतर | ३३०२ | ७९६० | ०.२१ | ४६०४ | ३३५६ | ४१.४८ |
| एकुण | २८९७०१३ | ३७०१२८२ | १०० | २०८१११२ | १६२०१७० | २७.७६ |

स्रोत-जिल्हा जनगणना अहवाल २००१ व २०११

## निष्कर्ष

- २०११ च्या जनगणनुनुसार औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्या घनता ३६६ आहे. सर्वाधीक लोकसंख्या घनता औरंगाबाद तालुक्यात ११९३ आहे तर सर्वात कमी लोकसंख्या घनता सोयगांव तालुक्यात १७१ आहे.
- औरंगाबाद महानगरामुळे व येथील औद्यागीकरणामुळे जिल्ह्याच्या एकुण लोकसंख्येच्या ४२.९६ टक्के लोकसंख्या एकट्या औरंगाबाद तालुक्यात वितरीत झाली आहे.
- १९७१ ते २०११ या कालावधीचा विचार करता १९८१ ते १९९१ या दशकात जिल्ह्यात सर्वाधीक ३९.९६ टक्यांनी लोकसंख्येत वृध्दी झाली आहे. तर याच दशकात नागरी लोकसंख्येमध्ये ८३.८७ टक्के वृध्दी झाली आहे.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.

- २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद तालुक्यात सर्वाधीक नागरी लोकसंख्या ८२.३१ टक्के असुन सोयगांव व फुलंब्री या दोन तालुक्यात नागरी लोकसंख्या शुन्य आहे.
- जिल्ह्यामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार साक्षर लोकसंख्या ७९.०२ आहे. सर्वाधीक साक्षर लोकसंख्या औरंगाबाद तालुक्यात ८५.०३ टक्के तर सर्वात कमी साक्षर लोकसंख्या सोयगांव तालुक्यात ७०.५७ टक्के आहे.
- जिल्ह्यात दर १००० पुरूषामागे ९२३ स्त्रीया असे प्रमाण आहे. तर हेच प्रमाण औरंगाबाद तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येमध्ये ९०२ व गंगापुर तालुक्यात नागरी भागात प्रति १००० पुरूषामागे केवळ ९०१ स्त्रीयांचे प्रमाण आहे.
- २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यामध्ये धर्मानुसार लोकसंख्या पाहिला असता हिंदु ६८.७७ टक्के, मुस्लीम २१.२५ टक्के तर बौध्द लोकसंख्या ८.३५ टक्के आहे. तर २००१ ते २०११ या दशकातील धर्मानुसार लोकसंख्या वृध्दीमध्ये सर्वाधीक वृध्दी मुस्लीम लोकसंख्येत ३८.१३ टक्के तर हिंदु २५.३७, बौध्द २५.०२ टक्केंनी वृध्दी झाली आहे.
- २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकुण हिंदु लोकसंख्येच्या ६५.२२ टक्के लोकसंख्या ग्रामीण मध्ये रहाते तर ३७.७७ टक्के लोकसंख्या नागरी भागात रहाते. तर मुस्लीम, बौध्द, जैन, ख्रिश्चन व शिख धर्मीय लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण मध्ये कमी असुन नागरी भागात जास्त आहे.

## संदर्भ साहित्य


- Jagdale, Kadam & Saptarshi (2000) : As patio Temporal Study of Population Growth in Pune District (1951-1991) Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika, Maharashtra Bhugolshstra Parishad, Vol, XIV, No.PP-25-39.
- Choudhari Dnyaneshwar Harikisan (Ph.D. Thesis) : A Critical Study of Agricultural Production and Productivity in Aurangabad district.
- उत्तमराव जगदाळे, प्रविण सप्तर्षी (२००२) : जून्नर तालुक्यातील मानवी साधनसंपत्तीचे मुल्यमापन (१९८१-१९९१), महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका, महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद, Vol, XVI, No.PP-27-45.
- औरंगाबाद जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल (२००१-२००२ ते २०११-२०१२)
- थोरात राजाराम माधव (पीएच.डी प्रबंध) : रायगड जिल्ह्यातील लोकसंख्या संसाधनाचा अभ्यास.
- औरंगाबाद जिल्हा जनगणना (२००१ व २०११)
- औरंगाबाद जिल्हा गॅझेटीअर


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief, ©EIJMR, All rights reserved.